SPECIAL OFFERS
ई-पेपर वेबसाईट बनवा
फक्त २९९९/-
SAVE UP TO 90%
NEWS
9359421909
ONLY THIS WEEK!
ORDER NOW
www.abhibee.com

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**



● वर्ष : ०२ ● अंक : ०१८ ● पुणे ● सोमवार, दि. २५ नोव्हेंबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



## बंडखोर नकोच : महाविकास आघाडीत काँग्रेसमध्येच बंडखोरी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
कोणत्याही निवडणुकीत बंडखोरीला फार महत्त्व येते. अनेकदा बंडखोर अपेक्षित विजयी उमेदवाराच्या पराभवास कारणीभूत ठरतात किंवा स्वपक्षाच्या उमेदवाराचा पराभव करतात. मात्र, शहरात तसे काहाही झाले नाही. बंडखोरांचा फारसा प्रभाव पडलाच नाही.

प्रामुख्याने महाविकास आघाडीतच व त्यातही काँग्रेसमध्ये बंडखोरी झाली होती. शिवाजीनगर मतदारसंघात मनीष आनंद, तर कसबा मतदारसंघात कमल व्यवहारे यांनी काँग्रेसच्या उमेदवारांसमोर आव्हान निर्माण केले होते. पर्वती मतदारसंघात काँग्रेसच्या आबा बागुल यांनी महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या अश्विनी कदम यांना आव्हान दिले होते. त्याशिवाय कोथरूड मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे पदाधिकारी विजय डाकले यांनी बंडखोरी केली होती. या बंडखोरांनी उमेदवारी अर्ज कायम ठेवल्यावर त्यांच्या पक्षांनी लगेचच त्यांच्यावर निलंबनाची कारवाई केली. मात्र, त्यांना निवडणुकीत फारशी मते मिळालीच नाहीत. विजयी उमेदवारांच्या मतांच्या तुलनेत तर ते एकदमच मागे पडले. शिवाजीनगरमध्ये मनीष आनंद यांना 13 हजार 28 मते मिळाली. बागुल यांना 10 हजार 476 मते मिळाली. कमल व्यवहारे यांना फक्त 552 मते मिळाली. विजय डाकले यांना 1125 मते मिळाली. त्यामुळे पुणेकर मतदारांनी बंडखोरांना अजिबात थारा दिला नाही, असे मतदानातून दिसून आले.

# जनतेच्या विश्वासाला विजय केला समर्पित

## खडकवासल्यात भिमराव तापकीर यांचा विजयी चौकार




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या तमाम नागरिकांनी दाखवलेल्या विश्वासाने मला चौथ्यांदा आपला लोकप्रतिनिधी म्हणून सेवा करण्याची संधी दिली आहे, यासाठी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. हा विजय केवळ माझा नाही, तर आपल्या सर्वांचा आहे. हा विजय आपल्या विकासाच्या स्वप्नांचा, आपल्या समस्यांच्या समाधानाचा, आणि एकत्रित काम करण्याच्या निर्धाराचा आहे. तुमच्या विश्वासाला हा विजय समर्पित करत अशा शब्दात खडकवासला विधानसभेचे विजयी उमेदवार भिमराव तापकीर यांनी विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर प्रतिक्रिया दिली.

"खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या तमाम नागरिकांनी दाखवलेल्या विश्वासाने मला चौथ्यांदा आपला लोकप्रतिनिधी म्हणून सेवा करण्याची संधी दिली आहे, यासाठी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. हा विजय केवळ माझा नाही, तर आपल्या सर्वांचा आहे. हा विजय आपल्या विकासाच्या स्वप्नांचा, आपल्या समस्यांच्या समाधानाचा, आणि एकत्रित काम करण्याच्या निर्धाराचा आहे. तुमच्या विश्वासाला हा विजय समर्पित करत अशा शब्दात खडकवासला विधानसभेचे विजयी उमेदवार भिमराव तापकीर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्यात.

आपल्या मतदारसंघातील नागरिकांनी दाखवलेल्या प्रेमाने आणि भारतीय जनता पक्ष व महायुतीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमांमुळेच आज ही वेळ आली आहे. हा विजय हा फक्त निवडणूक लढविण्याचा नव्हे तर आपल्या मतदारसंघाच्या सर्वांगीण प्रगतीचा महत्त्वाकांक्षी आराखडा प्रत्यक्षात आणण्याचा संकल्प आहे. आता पुढील वाटचाल ही आपणा सर्वांच्या सहकाऱ्यानेच होईल. खडकवासल्याच्या प्रत्येक नागरिकाचा आवाज हा माझ्यासाठी प्राधान्य असेल. मला खात्री आहे की, आपल्या एकतेच्या जोरावर आपण आपल्या मतदारसंघाला विकासाच्या नवीन उंचीवर नेऊ अशी भावना भिमराव तापकीर यांनी बोलून दाखवली.

या विजयानंतर त्यांनी मोठी विजयी रॅली काढत मतदारांचे आभार मानले. यावेळी महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खडकवासला विधानसभेच्या या निवडणुकीत भिमराव तापकीर यांचा तब्बल 52 हजार 322 मतांनी विजय झालाय. तापकीर यांना 1 लाख 63 हजार 131 मते मिळाली. तर त्यांचे प्रतिस्पर्धी असलेले राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे सचिन दोडके यांना 1 लाख 10 हजार 809 मते मिळाली. तर मनसेच्या मयुरेश वांजळे यांना 42 हजार 897 मते मिळाली आहेत. तर चौथ्या क्रमांकावर "वरील पैकी कोणी नाही" NOTA ला 2 हजार 900 मते मिळाली आहेत. त्यापाठोपाठ वंचितच्या संजय धिवार यांना 2 हजार 687, पिपाणी सारखी दिसणारी जुनी तुतारी म्हणून गणलेल्या गेलेल्या ट्रम्पेट चिन्हावर निवडणूक लढवलेले अपक्ष उमेदवार डॉ बाळासाहेब पोळ यांना 1 हजार 559 मते मिळाली असून ते सहाव्या क्रमांकावर आहेत.

तर काँग्रेसचे बंडखोर उमेदवार असलेल्या राहुल मते यांना 511 मते मिळाली आहेत. उरलेल्या इतर 8 उमेदवारांना 500 पेक्षा कमी मते मिळाली असून, यामध्ये सचिन दोडके वगळता सर्व उमेदवारांची अनामत रक्कम जप्त होणार आहे.

## आ. मिसाळ, आ. तापकीर यांच्या विजयाचा

# ॲड. प्रसन्नदादा जगताप मित्र परिवाराच्यावतीने जल्लोष





> पुन्हा एकदा जनतेने महायुतीला म्हणजेच प्रगतीला साथ दिली आहे. खडकवासला व पर्वती मतदारसंघातून माधुरीताई मिसाळ भीमराव तापकीर यांचे हार्दिक अभिनंदन. व त सर्व मतदार बंधू-भगिनींचं आभार मानतो. पर्वती व खडकवासला मतदारसंघाच्या विकासासाठी मी ही दोघांच्या सोबत असेल. ह्या दोन्ही मतदारसंघाचा सर्वांगीण विकास होणार आहे हा विश्वास आहे.
> - ॲड. प्रसन्नदादा जगताप, माजी उपमहापौर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पर्वती विधानसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार श्रीमती माधुरी मिसाळ व खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे श्री. भीमरावअण्णा तापकीर हे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. या विजयानिमित्त तसेच महायुतीच्या महाविजयानिम्मित ॲड. प्रसन्नदादा जगताप व मित्र परिवाराने हिंगणे बुद्रुक चौकात मोठा जल्लोष साजरा केला. तसेच विजयाबद्दल हार्दिक अभिनंदन केले. महायुतीच्या या भव्य विजयात बहुमोल योगदान देणाऱ्या सिंहगड रोड व परिसरातील नागरिकांचे माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी आभार मानले. ह्या दोन्ही मतदारसंघात विजयासाठी ॲड. प्रसन्नदादा जगताप मित्र परिवाराने मोठी मेहनत घेतली होती. त्या मेहनतीला फळ आले. गुलालाची उधळण करत लाडू वाटून व फटाके उडवून आनंद व्यक्त केला. ॲड प्रसन्नदादा जगताप यांच्या संपर्क कार्यालयासमोर आ. माधुरीताई मिसाळ व आमदार भीमराव तापकीर यांच्या प्रचंड बहुमताने विजय झाल्याने आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी माजी उपमहापौर ॲड . प्रसन्नदादा जगताप, राहुल जोशी, बाळासाहेब कुलकर्णी, भाऊसाहेब निकम, राहुल रुपदे, समीर आष्टे यांच्यासह कार्यकर्ते, व सिंहगड रोड भागातील नागरिक महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# वचपा काढलाच

- पुरंदरवर शिवतारेंचा भगवा!
- शिंदे गटाचे विजय शिवतारे विजयी

**पुरंदर (दै. आरंभ पर्व)**
पुरंदर हवेली मतदार संघावर पुन्हा एकदा भगवा फडकला असून पुरंदर हवेली मतदार संघात सर्वांचाच अंदाज चुकवत शिवसेनेचे (शिंदे गट) विजय शिवतारे यांच्या बाजूने निकाल लागला आहे. यात तिरंगी लढतीचा फायदा विजय शिवतारे यांनाच झाला. सुमारे 24188 मतांच्या फरकाने विजय शिवतारे यांनी प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीचे काँग्रेसचे संजय जगताप यांचा पराभव करून गेल्या निवडणूकीतील पराभवाचा वचपा काढला. युतीचे विजय शिवतारे यांना 1 लाख 25 हजार 819 मते मिळाली तर विरोधी संजय जगताप यांना 1 लाख 1 हजार 631 मते मिळाली आहेत. तिसरे उमेदवार राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार संभाजी झेंडे यांना 47196 मते पडली आहेत. शिवतारेंच्या विजयात या तिसऱ्या उमेदवाराचा ही मोठा फायदाच झाला आहे. सकाळी 7 वाजता प्रत्यक्ष मतदान मोजणीला सुरुवात झाली. टपाली मतदानातच काँग्रेसचे संजय जगताप यांना 161 मतांची आघाडी मिळाली होती. त्यानंतर विजय शिवतारे यांनी पहिल्या फेरीपासूनच आघाडी घेण्यास सुरुवात केली. ती आघाडी त्यांनी शेवटपर्यंत ठेवली. शासनाची लाडकी बहीण योजना, हवेली तालुक्यातील पाणी प्रश्न , स्वतंत्र महापालिका त्याच बरोबर पुरंदर तालुक्यातील गुंजवणी धरणाचे पाणी, आणि विमानतळ या भोवतीच ही निवडणूक फिरली. यावं मुद्यावरूनच शिवतारेनी मतदारांना मतदानाचे आवाहन केले होते. त्याला मतदारांनी ही भरभरून प्रतिसाद दिला. काँग्रेस चे उमेदवार संजय जगताप या मुद्यावर कमी पडले.

यात निवडणूकीच्या रिंगणात अजित पवार गटाचे उमेदवार संभाजी झेंडे मोठा खर्च करून ही तिसऱ्या क्रमांकावर फेकले गेले. मात्र त्यांची उमेदवारी विजय शिवतारे यांना मोठे यश देऊन गेली. झेंडे यांच्या रूपाने लोक सभेतील पराभवाचा वचपा काढण्यासाठी अजित पवार यांनीच संजय जगताप यांचा करेकट कार्यक्रम केल्याची चर्चा मतमोजणी केंद्रावर होती.

## मंत्रिपदासाठी 2 आमदारांची नावं चर्चेत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी अजित पवार गटाला बारामती, शिरूर, भोर, आंबेगाव, इंदापूर तालुक्यात आपला गड राखण्यात यश आले आहे. भाजपने दौंड तालुक्यातील आपली जागा कायम राखली आहे. पुरंदरमध्ये शिवसेना शिंदे गटाने आपली जागा काबीज गेली आहे. खेडमध्ये शिवसेना उबाठा गटाने यश मिळवले आहे, तर जुन्नर मतदारसंघात दोन्ही राष्ट्रवादी गटाच्या उमेदवारांना धूळ चारत अपक्ष शरद सोनवणे यांनी जोरदार मुसंडी मारली आहे. सध्या मंत्रिपदासाठी जिल्ह्यात बारामती अजित पवार, आंबेगाव दिलीप वळसे-पाटील, दौंड राहुल कुल, पुरंदर विजय शिवतारे तसेच जुन्नरचे अपक्ष आमदार शरद सोनवणे, जर जातीय समीकरणाद्वारे पाहिलं तर दत्तात्रय भरणे यांचाही मंत्रिमंडळात समावेश होऊ शकतो. त्यामुळे जिलह्यातील पाच शिलेदार मंत्रिपदाच्या रेसमध्ये असल्याचे दिसून येत आहे.

परंतु, आज होणाऱ्या मंत्रिमंडळात कोणाची वर्णी लागणार? याबाबत जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. तसेच आजच्या मंत्रिमंडळाकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## तापकीर यांच्या विजयाचा धायरीत जल्लोष





**पुणे (दै. आरंभ पर्व)**
खडकवासला विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेले भारतीय जनता पार्टीचे उमेदवार भीमराव तापकीर यांच्या विजयाचा धायरी मध्ये जल्लोष करण्यात आला.

गुलालाची उधळण करत फटाके फोडत नागरिकांना पेढे भरवून आनंद साजरा केला.

यावेळी भाजपा खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे सरचिटणीस बाप्पूसाहेब पोकळे व कार्यकर्त्यांनी त्यांच्या संपर्क कार्यालयासमोर जल्लोष केला.

"आमदार भीमराव अण्णा तापकीर यांचे अभिनंदन करतो.

आगामी काळात धायरी व परिसरात संपूर्ण खडकवासला मतदारसंघात विकासाचा धडाका सुरूच राहणार आहे. जनतेने खऱ्या अर्थाने काम करणाऱ्या नेतृत्वाला संधी दिली त्याबद्दल त्यांचे मी आभार मानतो. आगामी सरकारमध्ये आ. तापकीर यांना मंत्रीपद मिळो अशी आम्हा सर्व कार्यकर्त्यांची अपेक्षा आहे" अशी भावना बाप्पूसाहेब पोकळे यांनी आरंभपर्वकडे व्यक्त केली..

# पराभवाने मी संपणार नाही, पुन्हा मैदानात उतरेल : सचिन दोडके

## मतदारसंघातील जनतेचे दोडकेनी मानले आभार





> निवडणुकीत हार पराजय या दोन बाजू असतात. पराजय झाला म्हणून आपण खचून न जाता नागरिकांच्या सेवेला प्रथम प्राधान्य देत असतो. आजपासून पुन्हा तेवढ्याच जोमाने जनतेच्या सेवेत दाखल आहे. आणि इथून पुढच्या काळात देखील मतदारसंघाच्या विकासासाठी मी कटिबद्ध आहे. मतदारसंघातील सर्व जनतेचे आभार.
> - सचिन दोडके, मा. नगरसेवक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
खडकवासला विधानसभा मतदारसंघातील विधानसभा निवडणुकीमध्ये पराभवाचा सामना केलेले महाविकास आघाडीचे उमेदवार सचिन दोडके यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

पराभवाने मी संपणार नाही, पुन्हा जनसेवेसाठी अखंडपणे कार्यरत राहील.

खडकवासला मतदारसंघातील जनतेचे प्रश्न सोडण्यासाठी मी कटीबद्ध राहील अशी भावना दोडके यांनी व्यक्त केली.

पुढे बोलताना त्यांनी खडकवासला मतदारसंघातील सर्व मतदार बंधू भगिनींचे आभार मानले. ह्या निवडणुकांमध्ये झटणाऱ्या महाविकास आघाडीच्या कार्यकर्ते, विविध संघटना संस्था, पत्रकार यांचेही आभार मानले..

खडकवासला विधानसभा मतदारसंघातून दुसऱ्यांदा पराभव झाल्याबद्दल बोलताना सांगितले की राजकारण हा क्रिकेट सारखा खेळ आहे.कधी कधी शतक मारणारा खेळाडू ही शून्यावर बाद होतो . पुन्हा नवीन डावाला सुरुवात करतो.

एका पराभवाने कोणी संपत नाही , या निवडणुकीमध्ये जनतेचे चांगले समर्थन मला मिळाले. त्यामुळे त्यांच्यासाठी जनतेचा सेवक म्हणून मी नक्कीच काम करणार आहे..

आगामी काळातही खडकवासला मतदारसंघातील जे प्रश्न विधानसभा निवडणुकीमध्ये मी जे प्रश्न मांडले त्यावर मी नक्कीच पाठपुरावा करणार आहे. पद असो वा नसो मला मतदान करणाऱ्या जनतेसाठी धावून जायचं आणि काम करायचं हे धोरण मी अवलंबलं आहे.

आणि नव्या उमेदीने कामाला सुरुवात केली आहे.. असेही सचिन दोडके यांनी मत व्यक्त केले..

विधानसभा निवडणुकीमध्ये झालेल्या पराभवानंतर क्रिकेटची आवड असलेल्या दोडके यांनी मित्रासोबत क्रिकेटचा आनंद घेतला. या दरम्यान त्यांना अपघाताची माहिती समजली.

वारजे येथे हायवेवर इंडेन गॅसचा तब्बल 21 टन गॅस असलेला टँकर उलटून मोठी दुर्घटना घडली. गॅसची गाडी असल्याने खबरदारी घेऊन याठिकाणी खोळंबलेली वाहतूक सुरळीत करणे गरजेचे होते. याठिकाणी सचिन दोडके यांनी तत्काळ भेट दिली . क्रेन मागवून टँकर हटवण्याचे काम प्रगतीपथावर सुरू केले.

चांदणी चौकाकडून कात्रजकडे जाणारी खोळंबलेली वाहतूक पुन्हा पूर्ववत केली.

"क्या हार में क्या जीत में "म्हणत पुन्हा जनसेवेत सक्रिय झाले. नेता असावा तर असा म्हणत नागरिकांनी त्यांचे कौतुक व्यक्त केले.



अखेर चौकार मारलाच !
खडकवासला विधानसभा मतदारसंघातून
भारतीय जनता पार्टी व महायुतीचे उमेदवार
भीमरावअण्णा तापकीर
हे 52 हजार मतांनी
आमदार
पदी निवडून आल्याबद्दल
मन:पूर्वक अभिनंदन..!
प्रतिक गंगणे
व्यवस्थापकीय संपादक दैनिक आरंभ पर्व
संपर्क : ७२७६३१४१४२










दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.


मा.श्री.भिमराव
आण्णा तापकीर
यांची खडकवासला मतदारसंघामध्ये चौथ्यांदा
"आमदार"
पदी निवड झाल्यानिमित्त हार्दिक अभिनंदन..!
विजय जनतेच्या
विश्वासाचा..!
शुभेच्छुक : भारतीय जनता पार्टी खडकवासला मतदारसंघ


पराठा
सम्राट
लाडकी सुनबाई योजना
सासुबाईंच्या पराठ्यावर
सुनबाईचा पराठा
फ्री
*आवश्यक गोष्टी*
१) पराठा खायला येताना सासुबाईंना घेऊन येणे आवश्यक आहे.
२) सासुबाईंना जो पराठा देणार तोच पराठा सुनबाईला फ्री मिळणार.
३) कमीत कमी घरामधील चार लोकांना घेऊन येणे गरजेचे आहे.
7276314142 / 9284559577
पत्ता : पराठा सम्राट, मल्हार फूड कोर्ट,दिल्लीवाला डेअरी जवळ,आंबेगाव बु.पुणे


BJP
विजयी चौकार
मा. श्री. भिमराव आण्णा तापकिर
यांची खडकवासला विधानसभा मतदार संघाच्या
आमदार
पदी सलग चौथ्यांदा प्रचंड
बहुमतांनी निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक : श्री. हरिदास कृष्णा चरवड
B.E.Civil
• नगरसेवक, मा.स्थायी समिती सदस्य,
• उपाध्यक्ष - भाजपा पुणे शहर


एक अकेला सब पर भारी
मा. श्री. भिमराव आण्णा तापकीर
यांची खडकवासला मतदारसंघामध्ये चौथ्यांदा
"आमदार"
पदी निवड झाल्यानिमित्त हार्दिक अभिनंदन..!
केतन शिवाजी लांगोरे
वेदांत प्रशांत घुले पा.
साहिल रुपेश घुले पा.
शुभेच्छुक : मा. श्री. रुपेश (तात्या) घुले पाटील मित्र परिवार


श्री. भिमराव आण्णा तापकीर
यांची खडकवासला विधानसभा मतदार संघाच्या
आमदार पदी
सलग चौथ्यांदा भरघोस मतांनी निवड झाल्याबद्दल मनःपूर्वक
अभिनंदन
महाविजय रथ
आपला आमदार कामगिरी दमदार
श्री. बाप्पूसाहेब बाबासाहेब पोकळे (पाटील)
(सरचिटणीस, भाजपा खडकवासला विधानसभा मतदार संघ)


महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत खडकवासला मतदार संघामध्ये
मा. श्री. भीमराव अण्णा तापकीर
आणि पर्वती मतदारसंघामध्ये
मा. माधुरीताई मिसाळ
यांची भरघोस मतांनी विजय मिळवून आमदार पदी निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन!
ॲड. प्रसन्नदादा जगताप
मा. अध्यक्ष- शहर सुधारणा समिती, पुणे म.न.पा, विद्यमान नगरसेवक,
माजी उपमहापौर-पुणे म.न.पा., मा. चेअरमन विद्यमान सदस्य: पुणे मर्चंट को.ऑप.बँक
प्रदेश सदस्य भाजपा उद्योग आघाडी तथा पुणे लोकसभा संयोजक
advprasannadadajagtap 9822022950


मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील
कोथरुड विधानसभा
मा. माधुरीताई मिसाळ
पर्वती विधानसभा
मा. श्री. भीमराव (अण्णा) तापकीर
खडकवासला विधानसभा
मा. श्री. सुनिलभाऊ कांबळे
पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा
मा. श्री. चेतन तुपे
हडपसर विधानसभा
मा. श्री. सिद्धार्थ शिरोळे
शिवाजीनगर विधानसभा
पुणे शहरातील महायुतीच्या सर्व उमेदवारांचा प्रचंड मतांनी विजय होऊन 'आमदारपदी' निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !
मा. श्री. हेमंत रासने
कसबा विधानसभा
अरुण अनंता दांगट
प्रदेश सरचिटणीस
भाजपा किसान मोर्चा महाराष्ट्र


संकटांच्या तालमीत नेहमी विजेते निर्माण होतात..!
PERMANENT MLA
मा. श्री
भिमराव
आण्णा
तापकीर
यांची खडकवासला मतदारसंघाच्या
आमदारपदी
निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
श्री. वासुदेव शिवाजी भोसले
भाजपा अध्यक्ष, वारजे माळवाडी प्रभाग - ३२
सौ. रोहिणी वासुदेव भोसले
भाजपा उपाध्यक्ष, खडकवासला मतदार संघ


मा. श्री.
भिमराव
(आण्णा)
तापकीर
यांची खडकवासला विधानसभा
आमदार ! पदी
निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन
सौरभनाना जयश्री जयसिंग मते
अध्यक्ष-राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस, खडकवासला मतदार संघ,
मा. सरपंच खडकवासला

# वांजळेंच्या उमेदवारीचा दोडकेंना फटका

## खडकवासल्यात दोडकेंचा तब्बल ५२ हजारांनी पराभव

**पुणे (दै. आरंभ पर्व)** यंदा खडकवासला विधानसभा मतदारसंघात परिवर्तन घडेल की काय? अशी शक्यता वाटत असताना मतदारांनी पुन्हा एकदा महायुतीचे उमेदवार भीमराव तापकीर यांनाच साथ दिल्याने चौथ्यांदा मतदारसंघात ‘कमळ’ फुलले. मतदारसंघात ‘भाजप’चा गड राखण्यात तापकीर यांना यश मिळाले. गतवर्षी केवळ 2500 मतांनी निसटता पराभव झालेल्या सचिन दोडके यांचा भीमराव तापकीर यांनी 52 हजार 322 मताधिक्याने सलग दुसऱ्यांदा पराभव केला. तापकीर यांना 1 लाख 63 हजार 131, दोडके यांना 1 लाख 10 हजार 809 आणि मनसेचे उमेदवार मयुरेश वांजळे यांना 42,897 मते पडली. खडकवासला मतदारसंघामध्ये एकूण 14 उमेदवार रिंगणात असले, तरी महायुतीचे उमेदवार भीमराव तापकीर, महाविकास आघाडीचे उमेदवार सचिन दोडके आणि

- भीमराव तापकीर - १,६३,१३१
- सचिन दोडके - १,१०,८०९
- मयुरेश वांजळे - ४२,८९७

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार मयुरेश वांजळे यांच्यात तिरंगी लढत झाली. त्यामध्ये तापकीर यांनी तब्बल 52 हजारांच्या मताधिक्याने विजय मिळवला. या विजयामुळे खडकवासला मतदारसंघ हा भाजपचाच बालेकिल्ला असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. खडकवासला मतदारसंघाची निर्मिती 2019 मध्ये झाली आणि पहिल्याच निवडणुकीत मनसेचे रमेश वांजळे हे सर्वाधिक मताधिक्याने निवडून आले. 2021 मध्ये वांजळे यांच्या निधनानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपचे भीमराव तापकीर यांनी राष्ट्रवादी काॅंग्रेसमध्ये प्रवेश केलेल्या हर्षदा वांजळे यांचा पराभव करत विजय मिळवला. मात्र, 2019 च्या निवडणुकीत विजयासाठी तापकीर यांचा कस लागला. मतदारसंघ हातातून जातो की काय? असे वाटत असताना तापकीर यांना 2019 च्या विधानसभा निवडणुकीत केवळ 2500 मतांनी विजय मिळवता आला. सलग तीनवेळा आमदार राहिल्यामुळे यंदाच्या 2024 च्या निवडणुकीत तापकीर यांना मतदार नाकारण्याची शक्यता वर्तविली जात होती.

### हा विजय जनतेचा : भीमराव तापकीर

जनतेने मला सलग चौथ्यांदा निवडून दिले आहे. त्याबद्दल मी जनतेचा मनापासून ऋणी आहे. हा विजय केवळ माझा नाही तर जनतेचा विजय आहे. यापुढेही जनतेच्या विकासाच्या स्वप्नांचा, त्यांच्या समस्यांचे समाधान करीत एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार आहे, अशी भावना खडकवासला मतदारसंघातील महायुतीचे विजयी उमेदवार भीमराव तापकीर यांनी व्यक्त केली. महाविकास आघाडीच्या उमेदवाराने निकालापूर्वीच विजयाची मिरवणूक काढली आणि फलक लावले होते, असे विचारल्यावर केवळ एकच म्हण आठवते की ‘उतावळा नवरा आणि गुडघ्याला बाशिंग’ अशी मिश्कील टिप्पणी तापकीर यांनी केली. निवडणुकीत संयम राखणे अत्यंत आवश्यक आहे. २०१९ च्या निवडणुकीत देखील प्रतिस्पर्धी उमेदवाराने हेच केले होते. पण तेव्हाही पराभव स्वीकारावा लागला होता असेही ते म्हणाले.

शनिवारी (दि. 23) सकाळी 8 वाजता कोरेगाव पार्क येथील शासकीय गोदामात मतमोजणीला सुरुवात झाली. प्रारंभी 665 टपाली मतदानाची मोजणी झाली. त्यात भीमराव यांना 365 तर दोडके यांना 365 मते मिळाली. त्यानंतर पहिल्या फेरीत सचिन दोडके यांना 4776 आणि दुसऱ्या फेरीत 10,821 तर तापकीर यांना 4171 आणि 10440 मते पडली. पहिल्या व दुसऱ्या फेरीत दोडके 1064 मतांनी आघाडीवर होते. मात्र, तिसऱ्या आणि चौथ्या फेरीत तापकीर यांनी 1274 मतांनी आघाडी घेतली आणि शेवटपर्यंत आघाडी कायम राखत विजयश्री खेचून आणली. यंदा खडकवासला मतदारसंघात 56.53 टक्के मतदान झाले होते. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत मतदानाचा टक्का वाढला असल्याने हे वाढीव मतदान तापकीर यांच्यात पदरात पडल्याचे निकालातून दिसून आले.



गतवर्षी 2500 इतक्या कमी मतांनी विजयी ठरलेल्या भीमराव तापकीर यांना यंदाची निवडणूक जिंकणे तितकेसे सोपे नव्हते. त्यामुळे खडकवासल्याची जागा महायुतीच्या वाट्याला येऊनही तापकीर यांचे नाव उमेदवारीसाठी निश्चित करण्यास पक्षाने काहीसा विलंब लावला. यातच मनसे नेते राज ठाकरे यांनी भाजपला पाठिंबा जाहीर केल्यामुळे मतांची विभागणी होण्यासाठी मनसेकडून मयुरेश वांजळे यांना उभे करण्यात आले होते. त्यानुसार झालेही तसेच. मयुरेश वांजळे यांना 42,897 इतकी मते मिळाली. वांजळे यांनी दोडके यांची मते घेतल्याचा थेट फ़ायदा तापकीर यांना झाला. याशिवाय ‘कर्ण कितीही चांगला असला तरी शेवटी तो दुर्योधनाच्या पक्षातच असणार आहे,’ हा चुकीचा पक्ष आहे, असा दोडके यांच्याविरुद्ध अपप्रचारदेखील करण्यात आला होता. त्याचाही काहीसा परिणाम दोडके यांच्या विजयावर झाला तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्याचा फटकाही दोडके यांना बसल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले.

### मंत्रीपद मिळाले नाही तरी मी समाधानी

खडकवासल्याच्या प्रत्येक नागरिकाचा आवाज हा माझ्यासाठी प्राधान्य असेल. आपल्या एकतेच्या जोरावर आपण आपल्या मतदारसंघाला विकासाच्या नवीन उंचीवर नेऊ असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मंत्रीपद मिळाले तर आनंदच होईल. पण ते केंद्र आणि राज्य नेतृत्व निर्णय घेतील. मंत्रीपद मिळाले नाही तरी मी समाधानी आहे, असे तापकीर यांनी सांगितले.










